# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३८६-२२** **दिनांक २०/१२/२०२२**

## सायकल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पकडण्यात आचोळे पोलीसांना यश

दिनांक १५/१२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० ते ०२.१० वा. च्या सुमारास फिर्यादी शाम शंकर पाटील वय-४६ वर्षे, रा. मृदंग अपार्टमेंट, वसंत नगरी, सेक्टर-१, नालासोरापा पु. ता-वसई, जि-पालघर यांचा मुलगा स्मशानभुमी रोड, एव्हरशाईन, नालासोपारा पु. येथील रस्त्यावर सायकल उभा करुन पात्र विधीसाठी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्याची सायकल चोरी करुन चोरुन नेली होती. सदरबाबत आचोळे पोलीस ठाणे येथे गु.र.नं- ६२८/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे दिनांक १७/१२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वसई-नालासोपारा परिसरात तसेच आचोळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये सायकल चोरीचे गुन्हे घडत असलेबाबत व सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी अज्ञात चोरट्याचा शोध घेणेबाबत आचोळे पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व सी.सी.टी.व्ही फुटेजच्या अधारे अज्ञात चोरट्याचा शोध घेत होते.

दिनांक १८/१२/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करीत असताना सायंकाळी १७.३० वाजताचे दरम्यान अग्नीशमन दल, कार्यालय, नालासोपारा पुर्व येथील वसंत नगरी ते आचोळे गावाकडे जाण्याऱ्या रोडवर वसंत नगरी गेटचे दिशेने एक इसम **VIVELO** कंपनीची नारंगी काळ्या रंगाची गिअर असलेली सायकल चालवत घेवुन जात असताना मिळुन आला. सदर इसमाचा संशय आल्याने त्यास थांबवुन नमुद सायकलबाबत विचारपुस केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यास नमुद सायकलसह पोलीस ठाण्यात घेवुन येवुन पोलीस ठाणे अभिलेख पडताळला असता त्यामध्ये वर नमुद गुन्ह्यातील चोरीस गेलेली सायकल व संशयीत इमस याचेकडील मिळालेली सायकल हि हुबेहुब वर्णनाची मिळुन आली. आरोपी नामे राजकुमार गिरीष मेवाडा, वय-१८ वर्षे, रा रुम नं. १० साई कृपा चाळ, माऊली वॉशींग सेंटर समोर, आचोळे गाव नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर याचा नमुद गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस करुन सखोल तपास केला असता त्याचेकडुन ११ सायकल

एकुण ९८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील नमुद गुन्ह्याची यशस्वी उकल केली आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं- ६२८/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.नं- ४३१/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.रं.नं ४८७/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.नं- ४८९/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाण |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, अतिरीक्त कार्यभार परिमंडळ-२, श्री चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सशपाल सुर्यवंशी, पोउनि/सुहास म्हात्रे, सफौ/राजेश काळपुंड, पोहवा दत्तात्रय दाईंगडे, डी. एस. पाटील, सतिष चव्हाण, पोअं बालाजी संगमे, विनायक कचरे, मोहनदास बंडगर यांनी केलेली आहे.

---ooo---